■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – ३०५ ■ बुधवार दि.२३ जुलै २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 305 ■ Wednesday Dt. 23 July 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# बीड एलसीबीचे पोलीस निरीक्षक बंटेवाडांच्या कारकिर्दीचा गुन्हेगारीला लगाम!

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

**गुन्हेगारांनो सावधान! बीडची गुन्हे शाखा जागी झाली आहे**

# पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत आणि पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या कारवाया कौतुकास्पद!

## बीड जिल्ह्यात कायदा-सुव्यवस्थेला बळ; कॉवत आणि बंटेवाड यांची उत्तम कामगिरी

बीड । प्रतिनिधी

बीडच्या स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांनी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या अध्यक्षतेखाली काम करत अनेक गुन्हे उघडकीस आणत आपल्या कार्यक्षमतेची ठसा उमठवला आहे. त्यांच्या धडाकेबाज आणि काटेकोर कारवाईमुळे गुन्हेगारी जगतामध्ये खळबळ माजली असून अनेक साखळी गुन्ह्यांचा छडा लावण्यात त्यांना यश मिळाले आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या नेतृत्वाची जबाबदारी नुकतीच पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्याकडे सोपविण्यात आली असून त्यांच्या नियुक्तीने जिल्ह्यातील गुन्हेगारी जगतामध्ये एक प्रकारचे खळबळ माजली आहे.

बीड । प्रतिनिधी

बीडच्या स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांनी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या अध्यक्षतेखाली काम करत अनेक गुन्हे उघडकीस आणत आपल्या कार्यक्षमतेची ठसा उमठवला आहे. त्यांच्या धडाकेबाज आणि काटेकोर कारवाईमुळे गुन्हेगारी जगतामध्ये खळबळ माजली असून अनेक साखळी गुन्ह्यांचा छडा लावण्यात त्यांना यश मिळाले आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या नेतृत्वाची जबाबदारी नुकतीच पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्याकडे सोपविण्यात आली असून त्यांच्या नियुक्तीने जिल्ह्यातील गुन्हेगारी जगतामध्ये एक प्रकारचे खळबळ माजली आहे.

गेल्या महिन्यांपासून बीड जिल्ह्यात वाढत असलेल्या चोरी, फसवणूक, खंडणी, खून आणि अन्य गंभीर गुन्ह्यांवर स्थानिक गुन्हे शाखेने विशेष लक्ष केंद्रित केले आहे. पोलीस निरीक्षक बंटेवाड यांनी मिळालेल्या गुप्त माहितीनुसार विविध भागांमध्ये सापळे रचून गुन्हेगारांना अटक केली. काही प्रकरणांमध्ये त्यांनी अवघ्या काही तासांत गुन्ह्याचा छडा लावत आरोपींना गजाआड केले. पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि कडक आदेश तसेच पोलीस निरीक्षक बंटेवाड यांचे मैदानावरचे प्रभावी नेतृत्व हे गुन्हे शाखेच्या यशामागील मोठे कारण ठरत आहे. त्यांच्या कार्यपद्धतीमुळे सामान्य जनतेमध्ये पोलीस दलाविषयी विश्वास वाढत असून गुन्हेगारीला लगाम बसत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

▶ पान २ वर



## खामगाव शिवारात स्थानिक गुन्हे शाखेचा धाडसी छापा; २३ लाखांचा मुद्देमाल जप्त



### खामगाव शिवारातील गोदापात्रात स्थानिक गुन्हे शाखेचा छापा; २३ लाखांचा मुद्देमाल जप्त

गेवराई पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खामगाव शिवारामधील गोदापत्रात स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत तब्बल २३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अचानक छापा टाकत चार ट्रॅक्टर आणि त्यांना जोडलेल्या केण्या हस्तगत केल्या. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. गोपनीय माहितीच्या आधारे खामगाव शिवारातील एका संशयित ठिकाणी छापा टाकण्यात आला आहे. जप्त केलेल्या चार ट्रॅक्टर आणि केण्यांची अंदाजित किंमत २३ लाख रुपये इतकी असून याप्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे खामगाव परिसरात अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या माफियांचे धाबे दणाणले असून, जिल्ह्यात वाळू तस्करीस आळा घालण्यासाठी पोलिस प्रशासन कटिबद्ध असल्याचे या कारवाईने पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या आदेशानुसार बीड जिल्ह्यात गुन्हेगारी, अवैध धंदे व वाळू तस्करीवर अंकुश ठेवण्यासाठी विशेष मोहीम राबवली जात आहे. अशाच प्रकारच्या ठोस आणि धडाकेबाज कारवायांमुळे कायदा आणि सुव्यवस्था राखली जाणार, असा विश्वास जिल्ह्यातील जनतेत निर्माण झाला आहे.

## स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने गावठी कट्टा पकडला एक आरोपी ताब्यात

बीड । प्रतिनिधी

पोलीस बीड यांनी बीड जिल्हयामधील अवैध शस्त्र बाळगणाऱ्या ईसमांची माहीती काढुन कारवाई करण्याचे स्थानिक गुन्हे शाखेला आदेशीत केल्याने स्थानिक गुन्हे शाखेला दिनांक २३.०७.२०२५ रोजी गोपनिय बातमीदारामार्फत माहीती मिळाली की नवगन राजुरी ता.जि.बीड येथे बस स्थानक परीसरात असलेल्या विना नावाचे टपरी मध्ये गुलाबी रंगाचे टि शर्ट व काळी जिन्स् पॅन्ट् घातलेल्या इसमांनी त्याचे पॅन्ट्च्या आतमध्ये एक गावठी कट्टा खवलेला आहे.

सदरील बातमी वरून पथकाने नवगण राजुरी येथे जावुन सदरील ठिकाणी छापा टाकला असता एक ईसम प्रदीप अशोक वखरे, वय २७ वर्ष, रा. माळी गल्ली, राजुरी (न) ता.जि बीड हा मिळून आला त्याचे अंगझडती घेतली असता पॅन्ट्च्या आतमध्ये एक गावठी कट्टा मॅगझीनसह मिळुन आला. सदरील गावठी कट्टा त्याला गणेश श्रीराम बहीर रा. राजुरी (न) ता.जि बीड याने दिल्याचे सांगीतले. दोन्ही आरोपीविरुदध पोलीस ठाणे बीड ग्रामीण गु.र.नं २३७/२०२५ कलम ३/२५ शस्त्र अधिनियमाअंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. सदरील कामगिरी ही पोलीस अधीक्षक नवनित कॉवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा बीड बंटेवाड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार मारुती कांबळे, विष्णु सानप, विकास राठोड, भागवत शेलार चालक अतुल हराळे यांनी केली आहे.



## विद्युत दुरुस्तीची खाजगी कामे करणारा युवकास वीजेचा झटका लागून मृत्यूमुखी

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

शहरातील सावता माळी मंदिर परिसरातील रहिवासी सर्वपरिचित इलेक्ट्रिशन म्हणून विद्युतसंबंधी दुरुस्तीची खाजगी कामे करणारा २७ वर्षीय युवक विद्युत दुरुस्तीचे काम करताना परळी तालुक्यातील तळेगाव येथे शॉक लागून मृत्युमुखी पडल्याची घटना आज दुपारी ३.१५ वा. सुमारास घडली आहे. त्याच्या मृत्यूने हळहळ व्यक्त होत आहे.

याबाबत प्राप्त माहितीनुसार, परळी शहरातील सावता माळी मंदिर परिसरात राहणारा गजानन उर्फ मनोज नारायण लोखंडे (वय २७) हा युवक इलेक्ट्रिशियन म्हणून खाजगी कामे करायचा. असेच वीज दुरुस्तीचे काम करण्यासाठी तो तळेगाव येथे आज गेला होता. या ठिकाणी विद्युत दुरुस्तीचे काम सुरू असताना त्याला विजेचा शॉक लागला व तो खाली कोसळला. त्याचा या ठिकाणी जागीच मृत्यू झाला. मयताचे पार्थिव शवविच्छेदनासाठी परळीच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याच्या मृत्यूने परिचितांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान या प्रकरणी पोलीसांत मृत्यूची नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

## सिरसाळ्यामध्ये विनापरवाना पिस्तूलसह तिघे जेरबंद

सिरसाळा । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील सिरसळा येथे पोलिसांनी धडक कारवाई करत विनापरवाना पिस्तूल बाळगणाऱ्या तीन जणांना ताब्यात घेतले आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. स्थानिक पोलिसांना गुप्त माहिती मिळाली होती की, काही व्यक्ती सिरसळा परिसरात बेकायदेशीरपणे शस्त्रे बाळगून आहेत. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ सापळा रचला. मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक २२ जुलै मंगळवार रोजी ८:१५ वाजणेच्या सुमारास सिरसाळा ते मोहा जाणारे रोडवरील खदानीजवळ इसम नामे राम अभिमान धोत्रे वय ३० वर्षे रा. सिरसाळा ता. परळी वै. याने अवैद्य बेकायदेरित्या करण मरगु



कुन्हाडे, अशोक तुकाराम पवार दोन्ही रा. सिरसाळा ता.परळी वै. यांचेकडुन गावठी देशी कटटा (पिस्टल) खरेदी करून जवळ बाळगत असतांना मिळुन आला म्हणुन साहाय्यक पोलिस निरीक्षक गोरखनाथ बाबासाहेब दहीफळे यांच्या फिर्यादीवरून आरोपी क्र.१ रामा अभिमान धोतरे, अरोपी क्र.२ करण मरगु कुन्हाडे, अरोपी क्र.३ अशोक तुकाराम पवार सर्व राहणार सिरसाळा यांच्या विरुद्ध गु.र.न.२०४/२०२४ कलम ३,५,२५ शस्त्र अधीनियम १९५९ आर्म अॅकट प्रमाणे गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक आनंद जाधव करत आहे.

तसेच गावठी कट्टा खरेदी करण्याचा त्याचा उद्देश काय होता आणि यामागे आणखी कुणाचा सहभाग आहे का, याबाबत पोलीस कसून चौकशी करत आहेत. या घटनेमुळे सिरसळयातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# गेवराई येथील नवीन बसस्थानक परिसराला आले तळ्याचे स्वरूप

## राज्य परिवहन विभाग व नगरपालिका प्रशासनाचे रस्त्याच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई येथील बसस्थानक परिसरातील रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडले आहेत. त्याच प्रमाणे नाल्या देखील तुंबल्या आहेत. यामुळे पावसाचे पाणी रस्त्यावर साचत असल्याने बसस्थानक परिसरास तळ्याचे स्वरूप आले आहे. गेवराई बसस्थानक परिसराकडे राज्यपरिवहन महामंडळ व नगर पालिका प्रशासन दुर्लक्ष करीत असताना दिसुन येत आहे. बसस्थानाकच्या प्रवेशव्दारासमोरील रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडले आहेत.

गेवराई येथील बसस्थानकाच्या गेट समोरून मागील दहा पंधरा दिवसांपूर्वी नगर परिषदेच्या वतीने नवीन बसस्थानकाच्या पाठीमागील रहिवाशांना पाण्याची सोय व्हावी म्हणून जेसीबीच्या माध्यमातून पाइपलाइन खोदण्यात आली होती. पाइपलाइन बुजविण्यात आली मात्र रस्ता पुर्ण खराब झाला असून खड्डे पडले आहेत. दरम्यान सोमवारी रात्री झालेल्या पावसाने खड्ड्यात तुडुंब पाणी साचले असल्याने बसस्थानकातुन आत प्रवेश बाहेर प्रवेश करताना बसस्थानकात येत असलेल्या प्रवाशांसह बस चालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. खड्डे बुजनवण्याची मागणी होत आहे. गेवराई बसस्थानकाच्या समोर अशा प्रकारे पावसाचे पाणी साचत आहे. प्रवाशांची मोठी गैरसोय गेवराई बसस्थानक परिसरात प्रवाशांसाठी लागणाऱ्या सुविधांची वाणवा आहे. यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे. राज्य परिवहन विभागाने गेवराई बसस्थानकातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या संख्येचा विचार करता सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. बसस्थानकातील उर्वरीत विकास कामे पूर्ण करावीत अशी मागणी प्रवाशी व शहरवासींयाकडून करण्यात येत आहे.





# कितीही मोठे संकट आले तरीही धैर्याने तोंड द्या : ॲड. उज्वल निकम

## नवनिर्वाचित खासदार म्हणून गेवराईत सत्कार

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई वकील संघाच्या विनंतीला मान देऊन विशेष सरकारी वकील तथा राज्यसभा खासदार ॲड. उज्वल निकम साहेब गेवराई वकील संघाला भेट देऊन कायदेविषयक मार्गदर्शन केले. कायद्याविषयी सखोल माहिती त्यांनी दिली. आपल्या जीवनातील कितीही मोठे संकट आले तरी त्या संकटाशी दोन हात करून आपण जर धैर्याने तोंड देऊन त्या संकटावर विजय मिळवू शकतो, असे प्रतिपादन ॲड उज्वल निकम यांनी केले आहे.

त्यांच्या वकील क्षेत्रामधील स्वतःचे अनुभव थोडक्यामध्ये वकील संघाला बैठकीत त्यांनी व्यक्त केले आहे. गेवराई वकील संघाच्या वतीने नवनिर्वाचित राज्यसभा सदस्य ॲड उज्वल निकम साहेब यांचा सत्कार करण्यात आला तसेच बीड जिल्ह्याचे ज्येष्ठविधीज्ञ ॲड. बाळासाहेब कोल्हे यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी वकील संघाचे अध्यक्ष ॲड. श्री अमित मुळे उपाध्यक्ष ॲड. श्री सोमेश्वर कारके व सचिव ॲड. श्री प्रदीप मडके साहेब यांनी ॲड. उज्वल निकम आणि ॲड. बाळासाहेब कोल्हे यांचा यथोचित सत्कार केला. यावेळी वकील संघातील सर्व ज्येष्ठ विधीज्ञ ज्युनियर वकील आणि महिला वकील सदस्य उपस्थित होते.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना केंद्र सरकारने भारतरत्न पुरस्कार द्यावा : अक्षय गवळी

बीड । प्रतिनिधी



महाराष्ट्र राज्य सरकारने केंद्र सरकारकडे शिफारस करून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १ ऑगस्ट २०२५ रोजी साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त भारतरत्न पुरस्कार प्रदान करून सन्मानित करावे. अण्णाभाऊ साठे यांनी समाजातील शोषित आणि दुर्लक्षित वर्गासाठी आपल्या लेखणीतून आवाज उठवला आणि सामाजिक न्यायाची चळवळ मजबुत केली. अण्णाभाऊ साठे यांचे केवळ साहित्यीक योगदान नसुन, सामाजिक परिवर्तनामध्ये त्यांनी मोठी कामगिरी केली आहे.

त्यामुळेच त्यांना भारतरत्न सारख्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित करावे, अण्णाभाऊ साठे यांनी ३५ कादंबर्या, १० लोकनाट्य, २४ लघुकथा, १० पोवाडे, एक नाटक आणि प्रवास वर्णन लिहिले आहे. बालविवाह आणि हुंडा प्रथेला विरोध, अंधश्रध्दा निर्मुलन, जातीय भेदभाव, श्रमिकांचा संघर्ष याबाबत त्यांनी आपल्या लेखणीतून आवाज उठवला. त्यांच्या साहित्याचा रशियन, जर्मन, पॉलिश भाषेत अनुवाद झाला आहे. तर, महिला, दलित, शोषित, पिडीत यांच्या उध्दारासाठी त्यांनी प्रयत्न केले आहेत. अण्णाभाऊ साठे यांचे समाज परिवर्तनासाठी केवळ साहित्यीक योगदान नाही तर, सामाजिक स्तरावरही त्यांनी मोठी कामगिरी केली आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्र राज्यातील तमाम मातंग समाजाच्या भावनेचा आदर करून केंद्र सरकारने भारतरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करावे अशी मागणी मानवी हक्क अभियानचे युवा कार्यकर्ते तथा ग्रामपंचायत सदस्य अक्षय गवळी यांनी मागणी केली.

# ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त रविवारी परळीत युथ आयकॉन पत्रकार विलास बडे यांचे व्याख्यान

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल आणि पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त रविवार दि. २७ जुलै रोजी परळीत प्रसिद्ध प्रेरणादायक वक्ते, आयबीएन लोकमत या नामांकित वृत्त वाहिनीचे उपसंपादक विलास बडे यांच्या व्याखानाचे आयोजन करण्यात आले आहे. या व्याखानाला युवक, युवती आणि नागरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन मुख्य संयोजक, माजी नगरसेवक प्रा. पवन मुंडे यांनी केले आहे.

रविवार दिनांक २७ जुलै रोजी सकाळी ११ वाजता लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिर येथे विलास बडे यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम होणार आहे. ना. पंकजाताई मुंडे यांनी वाढदिवसाच्या निमित्ताने सामाजिक उपक्रम राबविण्याचे आवाहन केले होते. त्या आवाहनाला प्रतिसाद देत माजी नगरसेवक प्रा. पवन मुंडे यांनी युवकांना प्रेरणा मिळावी, चांगले विचार ऐकायला मिळावेत या उद्देशाने हा व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित केला आहे.

विलास बडे हे अतिशय नामांकित आणि लोकप्रिय पत्रकार आहेत. लोकप्रभा या साप्ताहिकातुन पत्रकारितेला सुरुवात करून आज ते आयबीएन लोकमत या आघाडीच्या वृत्त वाहिनेचे ते उपसंपादक आहेत. लातूर जिल्ह्यातील रहिवाशी असलेल्या विलास बडे यांनी प्रचंड मेहनत घेऊन आज यशोशिखर गाठले आहे. मराठवाड्याचा दुष्काळ असो की अतिवृष्टीने शेतकरी उद्धुस्त झालेला असो. अशा ठिकाणी ग्राउंड रिपोर्ट करून त्याला वाचा फोडणार म्हणजे फोडणार ही ओळख. ऊसतोड मजूरांचे प्रश्न असो की देवदासींच्या समस्या अशा विविध ज्वलंत प्रश्नाला वाचा फोडून न्याय मिळवून देणारे पत्रकार अशी विलास बडे यांची ओळख आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मुलाखत घेण्याची संधीसुद्धा विलास बडे यांना मिळालेली आहे.

### शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी

# शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धन दिवस



परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी वैजनाथ यथे निमित्त पशुसंवर्धन विभाग परळी वैजनाथ व राम रक्षा गोशाळा आयोजित गोपूजन, वंधत्व निवारण, जंतनाशन व गोचीड गोमाशी निर्म निर्मूलन शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदरील शिबिर अंतर्गत गोशाळेतील सर्व गो वर्गाचे जंतनाशक करण्यात आले. गोचीड गोमाशी प्रतिबंधात्मक औषधांची फवारणी करण्यात आली. अनउत्पादित पशुधनाची व आजारी पशुधनाची तपासणी करून उपचार करण्यात आला. सदरील कार्यक्रमासाठी सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन तालुका लघु पशु सर्व चिकित्सालय परळी वैजनाथ डॉ. एच.बी. पांडे, पशुधन विकास अधिकारी परळी वैजनाथ डॉ.पी.एल. आघाव, राम रक्षा गोशाळेचे संस्थापक कोठारी काकाजी, सुरज कोठारी, ज्योतीराम मुंडे, श्रीकृष्ण फड, गजानन मुंडे आदींनी सहभाग नोंदवला.

# भारतीय जनता पक्ष युवा मोर्चाच्या केज तालुकाध्यक्षपदी प्राचार्य राहुल गदळे यांची निवड

केज । प्रतिनिधी



भारतीय जनता पक्ष युवा मोर्चा केज तालुकाध्यक्षपदी प्राचार्य राहुल भैय्या गदळे यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीचे सर्वत्र स्वागत केले जात असुन त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पर्यावरण मंत्री महाराष्ट्र राज्य लोकनेत्या नामदार पंकजाताई मुंडे माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे, केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा व केज विधानसभा मतदार संघाचे किंगमेकर नंदकिशोर मुंदडा तसेच युवकांचे हृदयसम्राट युवानेते पनगेश्वर साखर कारखान्याचे चेअरमन अक्षयजी नंदकिशोर मुंदडा तालुका अध्यक्ष संदीप पाटील यांच्या आदेशाने भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा तालुकाध्यक्षपदी प्राचार्य राहुल भैय्या गदळे यांची निवड करण्यात आली आहे. प्राचार्य राहुल भैय्या गदळे यांच्या निवडीमुळे युवकांचे संघटन मोठ्या प्रमाणात होणार असून भारतीय जनता पक्षाची ताकद वाढणार असल्याचे चित्र दिसत आहे.

पान १ वरून...

## पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत आणि पोलीस

शिवाजी बंटेवाड यांनी कार्यभार स्वीकारल्यानंतर अवघ्या काही दिवसांतच चोरी, दरोडे, खंडणी, फसवणूक, शस्त्रसाठा यांसारख्या गुन्ह्यांमध्ये गुंतलेल्या गुन्हेगारांवर एकामागून एक अचूक कारवाया केल्या. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अलीकडेच काही फरार आरोपींना अटक करून न्यायप्रविष्ट केल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेचे सर्वत्र कौतुक होत आहे. या यशस्वी कारवायांमध्ये पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांचे रणनीतिक मार्गदर्शन आणि गुन्हेगारीविरोधी धोरण महत्त्वाचे ठरले. पोलीस निरीक्षक बंटेवाड यांनी आपल्या अनुभव, नेटके नियोजन आणि गुप्त बातमीदारीच्या जोरावर बीड जिल्ह्यात शांततेचा श्वास निर्माण केला आहे.

# १० ते १२ गावांना जोडणाऱ्या मुंगी ते कुंडी फाटा सिमेंट रस्ता मंजुर करा : भागवत दराडे

दिंद्रुड । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील १० ते १२ गावांना जोडणारा महत्त्वाचा रस्ता असलेल्या मुंगी ते कुंडी फाटा दरम्यानच्या सिमेंट रस्त्याला मंजुरी देऊन, हा रस्ता तात्काळ मार्गी लावुन,या परिसरातील नागरिकांच्या दळणवळणाची सोय करावी, अशी मागणी राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस जिल्हासरचिटणीस तथा जैतापूर देवठाणा-जैतापुर ग्रुप ग्राम पंचायत सरपंच भागवत दराडे यांच्यासह परिसरातील नागरिक, शेतकऱ्यांनी आ.प्रकाश दादा सोळंके यांच्याकडे केली.

यासंदर्भात राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे जिल्हासरचिटणीस तथा देवठाणा-जैतापुर ग्रुप ग्राम पंचायतचे सरपंच भागवत दराडे यांच्यासह परिसरातील गावच्या नागरिकांनी आ.प्रकाश दादा सोळंके यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,मुंगी ते कुंडी फाटा हे आठ ते दहा किमी दरम्यानचे अंतर असलेला रस्ता क्र.ग्रा मा.९५ असुन, हा दहा ते बारा गावांना जोडणारा प्रमुख रस्ता आहे. या रस्त्याचे झालेले काम हे अत्यंत निकृष्ट व हिन दर्जाचे झालेले असल्याने ते ठिकठिकाणी उखडून रस्त्याची चाळणी झाल्याने या रस्त्यावर चालणे कठीण झाले आहे. त्यामुळे या रस्त्याच्या सिमेंट रस्ता कामास आ.दादांनी मंजुरी देऊन, त्याचे काम तात्काळ करून घ्यावे. हा सिमेंट रस्ता झाल्यास परिसरातील मुंगी, देवठाणा, जैतापुर, कान्नापुर, सुकळी, आम्ला, कुंडी आदि १० ते १२ ग्रामीण भागातील गावांना राष्ट्रीय महामार्गास जोडणारा प्रमुख दळणवळणाचा रस्ता ठरून, इतर सुविधांसाठी सुध्दा परिसरातील नागरिकांना फायदेशीर ठरणारा रस्ता होणार आहे.त्यामुळे आ.प्रकाश दादा सोळंके यांनी मुंगी ते कुंडी फाटा सिमेंट रस्त्यास तात्काळ मंजुरी देऊन, त्याचे काम तात्काळ करून घ्यावे.अशी मागणी सरपंच भागवत दराडे यांच्यासहसोबत मुंगीचे सरपंच सचिन सोळंके व कुंडीचे सरपंच उमेश कांदे परिसरातील अनेक गावच्या नागरिक व शेतकऱ्यांनी केली आहे.



# ‘सैयारा’ चित्रपटाचे नाव बदलले जाणार का?

सैयारा : उर्दू आणि अरबी भाषेतील एक शब्द, जो सध्या आपल्या भारत देशात सर्व भाषिकांवर जादू करत आहे.

अलीकडेच, १८ जुलै २०२५ रोजी प्रदर्शित झालेला दिग्दर्शक मोहित सूरी यांचा चित्रपट ‘सैयारा’, यशराज फिल्म्सच्या बॅनरखाली आदित्य चोप्रा यांनी सादर केला आहे, आणि अक्षय विधानी यांनी निर्मित केलेला हा चित्रपट अहान पांडे आणि अनित पड्डा या दोन नवोदित कलाकारांना घेऊन फक्त ५० कोटी रुपयांच्या बजेटमध्ये बनवलेला आहे.

या चित्रपटाची जी तोंडी प्रसिद्धी (माउथ पब्लिसिटी) होत आहे, त्यामुळे या चित्रपटाने प्रदर्शित होऊन केवळ चार दिवसांतच ऑल इंडिया १०० कोटी रुपयांची कमाई केली आहे आणि वर्ल्ड वाइड १४० कोटींची कमाई केल्याची माहिती चित्रपट क्षेत्रातील अहवालांमधून समोर आली आहे.

या चित्रपटात असं काय आहे, की ज्यामुळे कोणताही मोठा कलाकार नसतानाही प्रेक्षकांवर याची अशी जादू चालली आहे, की थिएटरमध्ये प्रचंड गर्दी होत आहे? जिथे जिथे हा चित्रपट प्रदर्शित होत आहे, तिथे तिथे थिएटर हाऊसफुल होत आहेत. आणि हे ही शक्य आहे की, ही फिल्म लवकरच अन्य सर्व नवोदित कलाकारांच्या पहिल्या चित्रपटांच्या कमाईचे रेकॉर्ड तोडेल.

या चित्रपटाचं नाव ‘सैयारा’ आहे, हे पाहणारे बहुतांश प्रेक्षक याचा अर्थ जाणतात का? तर जवळजवळ ९०% लोकांना याचा अर्थ माहिती नसतो. कारण ’सैयारा’ हा शब्द ना हिंदी आहे, ना मराठी, ना इंग्रजी. तर तो शुद्ध उर्दू आणि अरबी भाषेतील आहे. ज्यांना उर्दू किंवा अरबी लिहिता, वाचता किंवा बोलता येते, त्यांनाच या शब्दाचा अर्थ ठाऊक असतो. किंवा ज्यांना उत्सुकता आहे ते थोडे लोक गुगलवर सर्च करून अर्थ शोधून काढतात. पण अशा लोकांची संख्या खूपच कमी असते. चित्रपट पाहणारे बहुतेक लोक फक्त तोंडी प्रसिद्धी आणि चित्रपटाबद्दलच्या सकारात्मक बाजू पाहून केवळ मनोरंजनासाठी थिएटरमध्ये जातात. बाकी त्यांना चित्रपटाच्या नावाचा आणि त्याच्या अर्थाचा काहीही फरक पडत नाही.

तर, अशा लोकांसाठी सांगतो – ‘सैयारा’ या शब्दाचा अर्थ:



उर्दू भाषेत आकाशात फिरणारा ग्रह किंवा तारा, आणि अरबी भाषेत भटकणारा किंवा निरंतर फिरणारा. याशिवाय, प्रेमात एकटा पडलेला किंवा एकाकी माणूस यालाही सैयारा म्हणतात.

आता एक कमाल गोष्ट लक्षात घ्या – गेल्या काही वर्षांपासून, म्हणजे सुप्रीम कोर्टाचा निर्णय येण्याआधीपर्यंत, आपल्या भारत देशात, जिथे उर्दू भाषा जन्माला आली, वाढली, पसरली, त्या भारत देशातच काही फिरकापरस्त शक्तींनी तिला परकी ठरवण्याचा कट रचला होता. पण तो कट अपयशी ठरला, जेव्हा सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले की उर्दू ही परकीय भाषा नाही, ती भारतातच जन्मलेली आहे. ती भारतीयांचीच भाषा आहे, त्यामुळे तिला वाचायला, लिहायला, बोलायला कोणीही बंदी घालू शकत नाही.

आता हेच पाहा – उर्दू आणि अरबी भाषेतील ‘सैयारा’ सारखा शब्द, जो एका हिंदी चित्रपटाच्या नावात वापरला गेला, तो संपूर्ण भारतभर प्रेक्षकांनी डोक्यावर घेतला. विशेषतः युवक-युवतींनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला.

यातून एकच गोष्ट सिद्ध होते – फिरकापरस्त ताकदी कितीही प्रयत्न करोत, पण भारतीयांसमोर त्या कधीच टिकू शकत नाहीत. जर टिकल्या असत्या, तर ‘सैयारा’ चित्रपट प्रदर्शित होण्याआधीच त्याचे नाव बदलले गेले असते. पण तसं काही झालं नाही. आणि आजही लाखो प्रेक्षक दररोज हा चित्रपट ’सैयारा’ या नावाने पाहण्यासाठी थिएटरमध्ये धावत आहेत.

ही एक जबरदस्त चपराक आहे त्या सडलेल्या विचारसरणीच्या राजकारण्यांवर, जे गाव, शहर, तालुका यांची नावं बदलण्यामागे लागले आहेत. तर मग आता हे राजकारणी ‘सैयारा’ या चित्रपटाचं नावही बदलतील का? की पुढे जाऊन असा फतवा काढतील की कोणताही निर्माता-दिग्दर्शक आपल्या चित्रपटाला उर्दू किंवा अरबी शब्दाने नाव देऊ शकत नाही?

लेखन – **एस.एम.युसूफ़** (मुक्तपत्रकार)
**आसेफ़नगर, बीड**

# आमदारांना दमडीही नाही !

## मतदार संघातील कामे रखडली, अनेक विभागांचा निधी रोखला

पात्रुड । प्रतिनिधी

लाडकी बहीण योजनेमुळे शासनाच्या तिजोरीवर अतिरिक्त भार आला आहे. त्याचा परिणाम विकास होत असून अनेक विभागांचा निधी रोखून ठेवण्यात आला आहे. या योजनेचा फटका आमदारांनाही बसत आहे. तीन महिन्यांचा कालावधी होत असताना अद्याप आमदारांचा फंड आला नाही. एक रुपयाही न आल्याने कामे रखडल्याची माहिती आहे. पूर्वी आमदारांना दोन कोटी रुपये वर्षाला ’आमदार फंड’ मिळत होता. तो आता पाच कोटी करण्यात आला आहे.

विधानसभा आमदारांना त्यांच्या क्षेत्रात यातून विविध विकास कामे करता येतात. तर विधान परिषदेतील आमदारांना त्यांनी निवडलेल्या जिल्ह्यात कामे करता येतात. जिल्हा परिषद, नगर पालिकेला, ग्रामपंचायत अनेक कामे करताना मर्यादा येतात. आमदार फंडाच्या माध्यमातून ही कामे करणे सोयीचे ठरते. नवीन आर्थिक वर्ष सुरू होऊन साडे तीन महिन्याचा काळ लोटला. परंतु आमदार फंडाचा खडकूही नियोजन विभागाला प्राप्त झाला नाही. त्यामुळे आमदारांकडून सूचविण्यात आलेली कामेच होत नसल्याचे सूत्रांकडून समजते. काही आमदारांनी ग्रामीण भागात व काहींनी त्यांच्या मतदार संघातील कामे प्रस्तावित केली आहे. परंतु अद्याप त्यावर अंमल झाला नाही. निधी नसल्याने काम करता येत नसल्याचे सांगण्यात येते.

**तिजोरीवर भार, सत्ताधारीही गार !**

’लाडकी बहीण’ योजनेंतर्गत लाभार्थी महिलांना १५०० रुपये महिना देण्यात येत आहे. यासाठी शासनाला निधीची तरतूद करावी लागत आहे. यामुळे शासनाच्या तिजोरीवर मोठा भार येत असून यासाठी अनेक कामांना कात्री लावण्यात येत असून काही विभागाचा निधी रोखून धरण्यात आल्याचे सांगण्यात येते. कंत्राटदारांचे ८९ हजार कोटींचे देयके अडकले आहे. यासाठी त्यांच्याकडून आंदोलन करण्यात आले होते. लाडकी बहीण योजनेमुळे त्यांची देयके अडकल्याची चर्चा आहे. या योजनेचा फटका विविध विभागांसोबत विरोधी आणि सत्ताधारी आमदारांनाही बसत असल्याचे दिसते.

# निम्मा खरीप हंगाम संपला तरी पीक कर्जवाटपास खाजगी बँकांची टाळाटाळ; अजितदादांनी हिसका दाखवावा!

## सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन : डॉ. गणेश ढवळे

बीड | प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात राष्ट्रीयीकृत, खाजगी व सहकारी अशा १९ बँकांच्या २१७ शाखा कार्यरत आहेत. खरीप हंगामासाठी या बँकांना १,४४० कोटी रुपयांचे पीककर्ज उद्दिष्ट दिले गेले आहे. मात्र जुलै अखेर आला तरी केवळ ८१५ कोटी ४५ लाख रुपयांचेच कर्जवाटप झाले असून आतापर्यंत ९५,९५५ शेतकऱ्यांना फक्त ५७ टक्केच कर्ज मिळाले आहे.

मे महिन्यात जिल्ह्यात पावसाचे चांगले आगमन झाले. अधूनमधून झालेल्या पावसामुळे ९९ टक्क्यांहून अधिक पेरणी झाली असली तरी बँकांनी शेतकऱ्यांना पीककर्ज देण्यास आखडता हात घेतला आहे. जिल्ह्यातील दोन बँकांनी अद्याप एकाही शेतकऱ्याला कर्ज दिलेले नाही, तर तीन बँकांनी केवळ २० शेतकऱ्यांपर्यंतच वाटप मर्यादित ठेवले आहे. दोन महिन्यांत उर्वरित ४३ टक्के कर्जवाटप करणे हे बँकांसाठी मोठे आव्हान ठरणार आहे.



खाजगी बँकांकडून शासनाच्या आदेशांकडे आणि प्रशासनाच्या सूचनांकडे दुर्लक्ष होत असून, शेतकरी वर्गाची दिशाभूल केली जात आहे. त्यामुळे वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांनी अशा बँकांना तात्काळ धडा शिकवावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे. यासाठी सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार आहे.

**खाजगी बँकांकडून शासनाच्या आदेशांना केराची टोपली!**

अक्सिस बँकेला ३५ कोटी व कोटक महिंद्रा बँकेला ३ कोटी रुपयांचे उद्दिष्ट देण्यात आले असतानाही या दोन्ही बँकांनी एकाही शेतकऱ्याला पीककर्ज दिलेले नाही. एचडीएफसी बँकेला १८ कोटींचे उद्दिष्ट देण्यात आले असून त्यांनी ११ कोटी ९० लाख रुपयांचे कर्जवाटप (६६ %) केले आहे. आरपीएल बँकेने केवळ ६ कर्जदारांना ९३ लाख रुपयांचेच पीककर्ज दिले आहे. आयसीआयसीआय बँकेने कळविलेला आकडा हा इतर प्रकारच्या कर्जाचा असून तो शेतकरी कर्जवाटपात दाखवून शासनाची दिशाभूल केल्याचे उघड झाले आहे. याउलट जिल्हा बँक, महाराष्ट्र ग्रामीण बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, स्टेट बँक ऑफ इंडिया आदींनी चांगले कर्जवाटप केले आहे. मात्र खाजगी बँकांच्या उदासीन धोरणामुळे शेतकरी त्रस्त आहेत.

**शेतकऱ्यांची मागणी**

खाजगी बँकांचे पीककर्जाबाबतचे धोरण नकारात्मक आहे. शासनाच्या आदेशांना केराची टोपली दाखविणाऱ्या बँकांवर कारवाई करावी, त्यांना हिसका दाखवावा!



## मुख्यमंत्री फडवणीस यांच्या वाढदिवसानिमीत्त धारूरमध्ये शालेय साहित्य व फळे वाटप

धारूर | प्रतिनिधी

किल्ले धारूर येथे निवासी मतीमंद मूकबधिर व अस्थिवग विद्यालय या ठिकाणी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवसा निमित मूकबधिर विद्यार्थी यांना शालेय साहित्य व फळे व खाऊ वाटप करण्यात आले. विविध सामाजिक कार्यक्रम घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस साजरा करण्यता आला.

यावेळी भारतीय जनता पार्टी चे प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा नगरध्यक्ष डॉ. स्वरुपसिंह हजारी, माजी तालुका अध्यक्ष ॲड. बालासाहेब चोले, शहर अध्यक्ष दत्ता भाऊ धोत्रे, नगरसेवक सचिन दुबे, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष गणेश बडे, भाजपा युवा मोर्चा शहराध्यक्ष ॲड.मोहन भोसले, सोशल मीडिया संयोजक रोहनसिंह हजारी, ज्येष्ठ नेते सुरेश नाना मुंडे, राधाकृष्ण चोले, रामधन वाव्हल, धनंजय मुंडे, मुख्याध्यक टोनगे, शिक्षक कानवटे, मोरे, सुरवसे, गाढवे, कोलेकर, पंडित, ढाकने, साखरे, कातकले आदी उपस्थित होते.

## रेसिडेन्शियल महाविद्यालयात 'सखी सावित्री' समितीमार्फत मुलींसाठी मार्गदर्शन व करिअर व्याख्यानाचे आयोजन

अहमदनगर | प्रतिनिधी



रेसिडेन्शियल कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात 'सखी सावित्री समिती'च्या वतीने मुलींसाठी विशेष मार्गदर्शन व करिअर विषयक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. मारुती शेळके व कैलास दिघे यांनी उपस्थित विद्यार्थिनींना मौल्यवान मार्गदर्शन दिले.

प्रा. शेळके यांनी विद्यार्थिनींना आत्मविश्वास, शिक्षणातील ध्येय धोरण, विविध क्षेत्रांतील करिअरच्या संधी, मुलींसमोरील आव्हाने व त्यावर मात करण्याचे उपाय यावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थिनींना स्वत:वर विश्वास ठेवून मेहनतीच्या जोरावर यश संपादन करता येते, हे विविध उदाहरणांच्या माध्यमातून स्पष्ट केले. प्रा.दिघे यांनी विद्यार्थिनींना व्यावसायिक शिक्षणाबद्दल सविस्तर माहिती सांगितली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य विजयकुमार पोकळे सर यांनी उपस्थित विद्यार्थिनींना मार्गदर्शन करत 'सखी सावित्री' समितीच्या उपक्रमांचे महत्त्व सांगितले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य दादासाहेब वांढेकर, प्रा. कांजवणे, प्रा.जगधने, प्रा. गदादे, प्रा.भोसले, चौधरी सर व शिक्षक मंडळी उपस्थित होते.समिती संयोजक प्रा.जालिंदर पिंपळे यांनी कार्यक्रमाचे स्वागत व प्रस्तावना केली. सूत्रसंचालन व आभार प्रा. डॉ. म्हातारदेव म्हस्के यांनी मानले. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये करिअरबाबत जागरूकता निर्माण होऊन त्यांना योग्य दिशा मिळेल, असा विश्वास महाविद्यालय व्यवस्थापनाने व्यक्त केला. उपस्थित विद्यार्थिनींनीही व्याख्यानास सकारात्मक प्रतिसाद दिला.

## हरिपाठ पाठांतर व कथाकथन, गोष्टी स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे : प्रा.आनंदगांवकर



केज | प्रतिनिधी

स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता.केज जि.बीड यांच्या वतीने ऑगस्ट माहिन्यात दि.१५ ऑगस्ट पूर्वी विद्यार्थ्यांसाठी हरिपाठ पाठांतर स्पर्धा व कथाकथन व गोष्टी सादरीकरण स्पर्धेचे आयोजन तीन वेगवेगळया गटात करण्यात आलेले आहे. विद्यार्थी गट, माहिला गट, पुरुष गट अशा तीन गटात स्पर्धा होणार आहेत.

विद्यार्थ्यांसाठी हरिपाठ पाठांतर स्पर्धा व कथाकथन, गोष्टी सादरीकरण स्पर्धा होणार आहेत. या दोन्ही स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे शिक्षकांनी यासाठी पुढाकार घ्यावा. पूर्वतयारी मार्गदर्शन करताना कवी प्रा. माणिकराव आनंदगावकर यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, आनंदगांव ता.केज स्पर्धापूर्व मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना आवाहन केले. स्पर्धेचे नियम व अटी याचीही माहिती कवि प्रा.माणिकराव आनंदगांवकर यांनी दिली. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक वाळके होते. यावेळी सहशिक्षक शिंदे, धायतडक, शिकारे, श्रीमती सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन, आभार प्रदर्शन गंथालयाचे प्रतिनिधी रविंद्र गायकवाड पेन्टर यांनी केले. यावेळी १ ली ते ५ वी पर्यंतचे सर्व विद्यार्थी विद्यार्थीनींची उपस्थिती होती. यावेळी सर्व शिक्षक व रविंद्र गायकवाड यांनीही मार्गदर्शन केले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आनंदगांव ता.केज जि.बीड येथे पूर्वतयारी मार्गदर्शन कार्यक्रम दि.२२ जुलै २०२५ रोजी घेण्यात आला.

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर



बीड | प्रतिनिधी

आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्ताने जिल्हाधिकारी कार्यालय बीड याठिकाणी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी व धर्मदाय रुग्णालय मदत कक्ष व एकदंत सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त व भाजपचे गटनेते आमदार प्रवीण दरेकर यांच्या अध्यक्षखाली विद्यमाने, रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी कार्यक्रम स्थळी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

आजच्या या रक्तदान शिबिरामध्ये अतिरिक्त जिल्हाधिकारी धार्मिक साहेब यांनी पहिले स्वेच्छा रक्तदान करून कार्यक्रमाचा श्रीगणेशा केला व शुभेच्छा दिल्या. ७५ लोकांनी रक्तदान केले आहे व अजून कार्यकर्त्यांचा व सुजान नागरिकांचा ओघ कायम आहे. आयोजित एकदंत सेवाभावी संस्था मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी बीड, एकनाथ कदम पाटील, गणेश मोहनराव जायभाये, स्वप्निल वरपे पाटील यांनी कार्यक्रमाचे आयोजन केलं आहे.

## सरस्वती विद्यालयात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती साजरी

धारूर | प्रतिनिधी



धारूरच्या सरस्वती विद्यालयात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मिळवणारच अशी सिंहगर्जना करणारे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती मोठ्या उत्साहामध्ये व आनंदामध्ये सरस्वती विद्यालय किल्ले धारूर या ठिकाणी साजरी करण्यात आली. सर्वप्रथम विद्यालयाचे मुख्याध्यापक तोष्णीवाल, राठोड, कुलकर्णी यांनी प्रतिमेचे पूजन केले त्यानंतर या कार्यक्रमाची प्रास्ताविक शाळेतील शिक्षक संतोष कसपटे यांनी केले. या कार्यक्रमासाठी शाळेमध्ये लोकमान्य टिळक यांच्या विषयी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आलेले होते. या व्याख्यानमालेत विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊ लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जीवनावर प्रकाश टाकला व अत्यंत चांगल्या प्रकारे आपले मत व्यक्त केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक शिंपले, मुंडे, बोबडे मॅडम, चरखा मॅडम, शिनगारे, खांडेकर, कंकाळ, शिंदे यांनी परिश्रम घेतली शेवट पसायदान घेऊन या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



## राम वडगाव येथील युवकांचा मोहन गुंड यांच्या उपस्थितीत शेकाप पक्षात जाहीर प्रवेश

केज | प्रतिनिधी

केज तालुक्यातील रामवडगाव (युसुफ वडगाव) येथे गावातील युवकांनी शेतकरी चळवळ प्रभावी करत वाढवण्यासाठी तसेच शेतकऱ्याच्या प्रश्नांवर काम करण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाचे नेते शेतकऱ्यांसाठी अहोरात्र काम करणारे मोहन गुंड यांच्या उपस्थितीत गावातील दिगंबर पांचाळ, शिवराज थळकरी, राहुल सावंत, राजाभाऊ थळकरी, शिवराज महादेव थळकरी, खंडू विभुते, अविनाश खरबड, शिवराज गणेश खानवरे शिवराय महाराज स्वामी यांनी शेतकरी कामगार पक्षांमध्ये जाहीर प्रवेश केला. यावेळी ॲड.जगन्नाथ थळकरी, प्रभुलिंग स्वामी, छबु मोडवे, भगीरथ मानधने, विष्णू देशमाने, गुरुप्रसाद थळकरी, राचलिंग पाटील, अशोक रोडे, अंगद ससाणे इतर शेतकरी उपस्थित होते. आजच्या बैठकीत एकमताने कुठले ही राजकारण न करता शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर एकत्र येऊन लाल बावटा घेऊन काम करण्याच्या भावना यावेळी व्यक्त केल्या.

## जवळबन येथे ग्रामविकास समितीतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

केज | प्रतिनिधी



तालुक्यातील जवळबन येथील ग्रामविकास समिती संस्थेतर्फे गावातील ६६ गुणवंत विद्यार्थ्यांचा शैक्षणिक उपयोगी साहित्य देऊन गुणगौरव करण्यात आला. गावातील ज्या विद्यार्थ्यांनी डॉक्टर, इंजिनियर तसेच शासकीय सेवांमध्ये नियुक्ती झाले आहेत अशा विद्यार्थ्यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. गावातील काही विद्यार्थी परदेशात शिक्षण घेत आहेत. त्यापैकी इटली येथे पीएच.डी. प्राप्त डॉ.सुधीर भाकरे तसेच फिजिओथेरपी पदवी प्राप्त डॉक्टर कुलकर्णी यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच पती प्रमोद करपे, प्रमुख उपस्थिती सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले, प्रा.बळवंते, जगदीश करपे, संस्थेचे कार्यवाह कुलकर्णी उपस्थित होते. जि.प. शाळेचे मुख्याध्यापक, माऊली विद्यालयाचे मुख्याध्यापक, सेवा सोसायटीचे चेअरमन नितीन भाकरे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. मुलांकडून अवाजवी गुणवत्तेची अपेक्षा न ठेवता मुलांना त्याच्या आवडीनुसार शिक्षण घेऊ द्यावे असे मत हनुमंत भोसले यांनी व्यक्त केले. विद्यार्थी मार्कवंत होण्यापेक्षा गुणवंत व्हावा असे मत प्रा.बळवंते यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले. मुलांमध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण होण्यासाठी तसेच शैक्षणिक प्रगतीसाठी गेल्या १८ वर्षापासून संस्थेतर्फे गुणवंताचा सत्कार सोहळा या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रास्ताविकातून प्रताप भाकरे यांनी संस्थेच्या सामाजिक आणि शैक्षणिक कार्याचा इतिहास सांगितला. दोन्ही शाळेतील शैक्षणिक कामकाजाबाबत ग्रामस्थांच्या वतीने समाधान व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार डॉ.तानाजी जाधव यांनी केले. कार्यक्रमास नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अंबाजोगाई शहरातील अंतर्गत येणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचा बेमुदत आंदोलन करण्याचा इशारा

# रमाई घरकुल लाभार्थ्यांना निधी तात्काळ वितरित करा

अंबाजोगाई | प्रतिनिधी



आंबेजोगाईत गेल्या बऱ्याच काळापासून वंचित बहुजन आघाडी संबंधित प्रशासकीय अधिकारी व प्रशासकीय कर्मचारी यांच्याकडे पाठपुरा करत असून यापैकी अनेक समस्या सोडविण्यात विलंब होत असल्यामुळे वंचित बहुजन आघाडीने विविध मागण्यांसाठी नगरपरिषद कार्यालय समोर मागण्या पूर्ण होईपर्यंत सोमवार दिनांक २८ जुलै २०२५ रोजी पासून नगरपरिषद कार्यालयीन वेळेत बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा इशारा अंबाजोगाई नगर परिषदेला निवेदनाद्वारे दिला आहे.

वंचित बहुजन आघाडीच्या विविध मागण्या अशा की, गेल्या अनेक दिवसांनी होत असलेली टाळाटाळ थांबून पी टी आर नोंदणी प्रक्रिया जलद गतीने करून अधिकृत प्रमुखाची व वरिष्ठ लिपिकाची नेमणूक करावी व ही प्रक्रिया सुरळीत करण्यात यावी. तसेच भिमाई नगर साकुर परिसर मांडवा रोड ईदगाह परिसर व बिलाल नगर परिसर नगर परिषद हद्दीमध्ये समावेश करत रमाई आवास, पंतप्रधान आवास योजना व शहर विकास योजना या भागात राबविण्यात याव्यात., अंबाजोगाई शहरातील छत्रपती शिवाजी महाराज, चौक परिसरात असलेली महात्मा ज्योतिबा फुले नगर या वस्तीतील घर धारकांची पी टी आर नोंदणी करण्यात यावी. व येथील नागरिकांना रमाई आवास व पंतप्रधान आवास घरकुल योजनेचा लाभ देण्यात यावा., दिव्यांग बांधवांसाठी असलेला राखीव पाच टक्के निधी लाभार्थ्यांच्या खात्यात वितरित करण्यात आला आहे. त्या रकमेत तफावत असून याची चौकशी करून दिव्यांग बांधवांची उर्वरित रक्कम पाच टक्के प्रमाणेच वितरित करण्यात यावी., नगरपरिषद अंतर्गत असणाऱ्या सर्व शासकीय कर्मचारी व अधिकारी यांचे थकीत वेतन अदा करण्यात यावे., दुसऱ्या टप्प्यात मंजूर १२३ लाभार्थ्यांचा रमाई आवास घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांची प्रक्रिया पूर्ण झाली असून लाभार्थी यांना पहिला हप्ता वितरित करून पुढील प्रक्रिया सुरळीत करण्यात यावी., नगरपरिषद अंतर्गत येणाऱ्या संगणक विभाग व कंत्राटी कर्मचारी व पाणीपुरवठा विभागातील कामगारांना समान काम किमान वेतन लागू करत सफाई कामगार सह सर्वांचे थकित वेतन दोन दिवसात पदा करण्यात यावे., परळवेस समता नगर भागातील बंद असलेले आरोग्य केंद्र तात्काळ सुरू करून गोरगरीब नागरिकांसाठी रुग्णालय सुरू करण्यात यावे., एलआयसी ऑफिस मागे असणारे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिकेत वेळेची मर्यादा कमी असल्याने विद्यार्थी प्रवेश कमी होत आहेत.

यात सकाळी आठ ते रात्री अकरा वाजेपर्यंत ची वेळ नगरपरिषद मार्फत आवश्यक अपुऱ्या असणाऱ्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात अशा विविध मागण्यांसाठी आज वंचित बहुजन आघाडीच्या वतीने नगरपरिषद मुख्याधिकारी तथा प्रशासक यांना निवेदन देण्यात आले. निवेदन देता वेळेस वंचित बहुजन आघाडीचे शहर अध्यक्ष गोविंद मस्के, शहर महासचिव नितीन सर्वदे, वंचित बहुजन आघाडीचे शहर प्रवक्ते उमेश शिंदे, शहर उपाध्यक्ष शेख रशीद, शहर उपाध्यक्ष धम्मपाल मोरे, श्रीकांत वाघमारे, पवन वेडे, समाधान कसबे, अतुल सोनवणे, सागर उबाळे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## बीड जिल्ह्यातील मच्छीमार बांधवांसाठी एक दिवशीय होणार क्रिकेट सामना

**युवाशक्ती प्रीमियर लीग २०२५ आयोजन आदर्श देवगाव या ठिकाणी होणार क्रिकेट सामना**

**भोई समाजाचे युवा नेतृत्व भीमा गहिरे यांच्याकडून प्रथम बक्षीस**

बीड | प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील आदर्श देवगाव या ठिकाणी युवाशक्ती प्रीमियर लीग २०२५ एक दिवशीय भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, सदर क्रिकेट स्पर्धा दिनांक २६,७ ,२०२५ वार शनिवारी रोजी सकाळी नऊ वाजता या क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन ठेवण्यात आले आहेत.



या क्रिकेट स्पर्धेला प्रमुख मान्यवर, प्रमुख उपस्थिति सुंदर भैया चव्हाण सरपंच नाथापुर, जगदीश काका फरताड़े शेतकरी नेते, ज्ञानेश्वर लांडगे सर शिक्षक, नंदकुमार नगरे कोषाध्यक्ष कृति समिति, ज्ञानेश्वर दादा सुरवसे, मा, सरपंच माधव काका शेंडगे सरपंच परडी, मुकुंद भैया सुरवसे सरपंच देवगांव, पप्पू भैया सुरवसे युवा उद्योजक, हरीश भैया बादाडे चेअरमेन महाराष्ट्र नागरी,महादेव सुरवसे ऊपसरपंच, गोविन्द भाऊ बादाडे सरपंच काडी वडगांव, निवृत्ति लिंबोरे, चेअरमेन, सतीश बप्पा बड़े मा नगरसेवक विलास कारके युवा नेते, राहुल भैया सुरवसे उपाध्यक्ष संभाजी ब्रिगेड, युवा पत्रकार अंकुश भैय्या गवळी, ग्रामपंचायत सदस्य गवळी ज्ञानेश्वर, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष गणेश गवळी, ग्रामपंचायत सदस्य अंकुश ईतापुरे, संकेत लंगडे प्रहार जनशक्ती पक्ष तालुका अध्यक्ष, बजरंग चव्हाण सरपंच खापरवाडी आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या क्रिकेट स्पर्धेचे मार्गदर्शक सिकंदर शेख, क्रिकेटचे प्रथम बक्षीस भोई समाज बांधवांचे जिल्ह्याचे नेतृत्व भीमा गहिरे यांच्या वतीने अकरा हजार एकशे अकरा रुपयांचे प्रथम बक्षीस ठेवण्यात आले आहे, द्वितीय बक्षीस शोहेब भैय्या शेख, समीर भैया शेख यांच्यावतीने पाच हजार पाचशे पंचावन्न रुपयाचे बक्षीस ठेवण्यात आले आहे, तृतीय बक्षीस नितीन लुचारे यांच्या वतीने तीन हजार तिनशे तेतीस रुपयाचे बक्षीस ठेवण्यात आले आहे, याप्रसंगी सदरील भव्य एक दिवशी क्रिकेट स्पर्धा होणार आहेत, याप्रसंगी मॅन ऑफ द सिरीज परशुराम लुचारे यांच्याकडून ५५५ बक्षीस ठेवण्यात आले, बेस्ट बॉलर म्हणून मच्छिंद्र बनगे यांच्यावतीने ५५५ चे बक्षीस ठेवण्यात आले आहे, बेस्ट बॅट्समन लहू कचरे यांच्यावतीने ५५५ बक्षीस ठेवण्यात आले, याप्रसंगी या भव्य दिव्य क्रिकेट स्पर्धेला उपस्थित राहण्याचा आव्हान आयोजक विलास लुचारे, सिद्धेश्वर लुचारे यांनी केले आहे.

# चकलांबा - गेवराई रस्त्याचे काम कासवगतीने; पांढरवाडी पुलाजवळ वाहनधारकांचे हाल!

## पांढरवाडी जवळील पुलाचे काम अत्यंत संथगतीने, पर्यायी रस्ता अपघाताच्या उंबरठ्यावर? संबंधित गुत्तेदारांची उदासीनता आणि इंजिनियरची दुर्लक्षवृत्ती नागरिकांच्या जिवावर!

गेवराई । प्रतिनिधी

चकलांबा ते गेवराई दरम्यान रस्त्याचे डांबरीकरण आणि मजबुतीकरणाचे काम सुरू असताना पावसाळ्याच्या दिवसातही कामाचा वेग अत्यंत मंद आहे. विशेषतः पांढरवाडीजवळील पुलाचे काम गेल्या अनेक दिवसांपासून संथगतीने सुरू असून, वाहनचालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. पुलाचे काम सुरू असल्याने बाजूला पर्यायी मार्ग तयार करण्यात आला आहे, परंतु तो रस्ता अत्यंत खराब असून चिखल, खड्डे आणि अरुंद मार्गामुळे वाहनधारकांना त्रास सहन करावा लागत आहे. या ठिकाणी अपघाताचा धोका कायम आहे.

शालेय वाहने, रुग्णवाहिका, व ट्रॅक्टरसारख्या मोठ्या वाहनांना यामुळे अधिक अडथळे येत आहेत. या पुलाचे काम पावसाळ्याच्या तोंडावर सुरू असले तरी अत्यंत संथगतीने सुरू आहे. या मार्गावरून दररोज शेकडो वाहने ये-जा करतात, मात्र अपूर्ण पुलामुळे वाहनचालकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. पर्यायी मार्ग तयार केला असला तरी तो नदीतून आहे आणि अत्यंत खराब स्थितीत आहे. चिखल, खड्डे आणि पाण्याच्या साच्यांमुळे वाहनांची तुफान कोंडी निर्माण होते. विशेषतः दुचाकी व छोट्या वाहनचालकांना चिखलात घसरून पडण्याचा धोका कायम आहे. अपघाताचे प्रमाण वाढू लागल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने त्वरित या कामाकडे लक्ष देऊन पावसाळ्याच्या काळात होणारा त्रास दूर करावा, तसेच पावसामुळे परिस्थिती अजूनच बिकट होऊ लागली आहे. संबंधितांनी त्वरित लक्ष घालून कामाचा वेग वाढवावा आणि वाहनधारकांसाठी सुरक्षित व सोयीस्कर मार्ग उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.



### आमदार विजयसिंह पंडित यांनी लक्ष घालणे गरजेचे?



चकलांबा ते गेवराई रस्त्याचे डांबरीकरण सुरू असतानाच पांढरवाडीजवळील पुलाचे काम अतिशय संथगतीने सुरू आहे. पावसाळ्याच्या दिवसांतही कामात कोणताही वेग न दिसल्याने या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांची प्रचंड गैरसोय होत आहे. बंद रस्त्यामुळे प्रशासनाने बाजूचा पर्यायी मार्ग तयार केला असला तरी तो रस्ता पूर्णतः खराब असून, चिखल, खड्डे आणि अरुंद रस्त्यामुळे दररोज नागरिक त्रस्त होत आहेत. शालेय मुलांच्या वाहनांपासून ते रुग्णवाहिकांपर्यंत साऱ्यांनाच या अर्धवट कामामुळे धोका निर्माण झाला आहे. या प्रश्नाकडे आमदार विजयसिंह पंडित यांनी तात्काळ लक्ष घालून कामाचा वेग वाढवण्यास संबंधित विभागावर दबाव आणावा, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.



## छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजय घाडगे यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा जाहीर निषेध

केज । प्रतिनिधी

शेतकऱ्यांची बाजू मांडणाऱ्या छावा मराठा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजय घाडगे यांच्यावर झालेल्या प्राणघातक हत्याच्या निषेधार्थ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केज तहसीलदारांमार्फत दि.२२ जुलै रोजी निवेदन सादर करण्यात आले.

राज्य कृषी मंत्री माणिक कोकाटे हे विधान भवनांमध्ये ऑनलाईन जंगली रमी खेळत असल्याचे व्हिडिओ प्रसार माध्यमात प्रसारित झाले आहेत. त्याच्या निषेधार्थ विजय घाडगे यांनी लातूर येथे पत्रकार परिषेदेत राष्ट्रीवादी अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना शेतकरी हिताच्या सबंधीचे निवेदन देऊन शेतकरी कर्ज माफी, आत्महत्या, पिकविमा, हमीभाव, पिक नुकसान भरपाई, अनुदान इत्यादि विषयाचे निवेदन छावा प्रदेशाध्यक्ष विजय घाडगे यांनी शेतकरी सन्मानार्थ प्रश्न विचारण्याच्या कारणावरून त्यांना राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या गुंडशाही प्रवृत्तीच्या गुंडांनी प्राणघातक हल्ला करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याने त्यांची प्रकृती चिंताजनक असून सर्व स्तरातून याचा जाहीर निषेध व्यक्त केला जात आहे.

सबंधित निवेदनावर छावा संघटनेचे बीड जिल्हा अध्यक्ष शिवाजीदादा ठोंबरे, योगेश्वर अंबाड, रामहरी कोल्हे, दिगंबर नाना तपसे, ओम सपाटे, सुनील कागदे व प्रवीण पवार इत्यादींच्या स्वाक्षऱ्या आहेत. तरी विजयकुमार घाडगे यांच्या जिवितास काही धोका झाल्यास सर्वस्वी प्रशासन व सरकार जबाबदार राहील. त्याचप्रमाणे प्रशासनाने तात्काळ दखल न घेतल्यास संविधानिक पद्धतीने, लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल असे सबंधित निवेदनात नमूद करण्यात आलेले आहे.

## ना. पंकजाताई मुंडेंनी मंजूर केलेल्या परळीच्या पशुवैद्यकीय महाविद्यालयासाठी ७२ एकर शासकीय गायरान जमीन पशुसंवर्धन विभागाला प्रदान

# महसूल व वन विभागाचा आदेश निर्गमित; महाविद्यालय उभारणीचा मार्ग मोकळा

मुंबई । प्रतिनिधी

राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी मंजूर करून आणलेल्या परळीच्या पशुवैद्यकीय महाविद्यालयासाठी परळी व लोणी येथील ७२ एकर शासकीय गायरान जमीन महसूल व वन विभागाने पशुसंवर्धन विभागाला प्रदान केली आहे. याबाबतचा शासन निर्णय आज निर्गमित करण्यात आला. या आदेशामुळे परळी वैजनाथ येथे नवे पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

परळी तालुक्यातील मौजे लोणी येथील गट क्र. ०७ मधील ८ हेक्टर ८० आर (२२ एकर) व मौजे परळी येथील स.नं. ४७८ मधील २० हेक्टर (५० एकर) अशी एकूण ७२ एकर जमीन नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालय आणि पशुधन प्रक्षेत्र उभारणीसाठी प्रदान करण्यात येणार आहे. या संदर्भातील शासन मान्यता महसूल व वन विभागाने हा प्रस्ताव मंजूर केला आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ व त्यासंबंधित नियमांनुसार ही जमीन पशुसंवर्धन विभागाला हस्तांतरित करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे बीड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाडा भागातील पशुवैद्यकीय शिक्षण व संशोधनाला नवे बळ मिळेल आणि शेतकरी व पशुपालकांना आधुनिक सेवा देण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण होण्यास मदत होणार आहे.



**परळीचा लौकिक वाढेल : ना. पंकजाताई मुंडे**

परळीत होणाऱ्या पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या माध्यमातून मराठवाड्यात एक मोठे शैक्षणिक केंद्र उभारले जाणार आहे. पंकजाताई मुंडे यांनी मंत्री होताच पुढाकार घेऊन पाठपुरावा करत शासन दरबारी हा प्रकल्प मंजूर करून घेतलेला आहे. स्थानिक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी नवे दालन उभे राहणार आहे. पशुसंवर्धन संशोधनासाठी स्वतंत्र प्रक्षेत्र निर्माण होईल. स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना तसेच शेतकरी व पशुपालकांसाठी तांत्रिक व आधुनिक सेवा उपलब्ध होणार आहेत. दरम्यान, महाविद्यालया करिता जागा उपलब्ध झाल्यामुळे आता या प्रक्रियेला गती मिळणार आहे. आधुनिक सुविधा आणि तंत्रज्ञानाची जोड असलेले हे महाविद्यालय परळी तालुक्याचे लौकिक वाढवेल. सोबतच राज्याच्या पशूवैद्यकीय क्षेत्राला देखील यामुळे नवी उभारी मिळेल असं सांगत ना. पंकजाताई मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# पिंपळगाव नाकले ते दिंद्रुड रस्त्याची दुरावस्था; शालेय विद्यार्थी, नागरिकांची गैरसोय : अक्षय गवळी

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील पिंपळगाव नाकले ते दिंद्रुड गावाला जोडणाऱ्या मुख्य रस्त्याची दुरावस्था झाली असून पिंपळगाव ते दिंद्रुड या ३ किलोमीटर अंतराच्या रस्त्यावर जागोजागी मुरूम टाकल्यामुळे चिखल मोठ्या प्रमाणात साचला आहे रस्त्यावरून वाहनधारकांना तारेवरची कसरत करत जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. संबंधित विभागाने वेळीच लक्ष घालून रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी विद्यार्थी आणि ग्रामस्थांतून होत आहे.

या गावांना जोडणारा रस्त्याची दुरावस्था झाली असून अनेक ठिकाणी रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. संबंधित विभागाचे याकडे दुर्लक्ष होत आहे. या मार्गावरील अनेक गावातील नागरीकांना उद्योग, व्यवसाय, शाळा, नोकरी, रुग्णालय महाविद्यालयीन शिक्षणासाठी दिंद्रुडला यावे लागते. अशा या चिखलाच्या रस्त्यामुळे जीव मुठीत घेत जीवघेणा प्रवास करावे लागत असून रात्रीच्या वेळी खड्ड्याचा आणि चिखलाचा अंदाज येत नसल्याने सातत्याने अपघात होत आहेत. पिंपळगाव नाकले ते दिंद्रुड या ३ किमी अंतरावरती खड्डे चिखल झाल्यामुळे वाहन चालवत असताना चालकांना कसरत करावी लागत आहे. रस्त्याच्या दुरावस्थेमुळे बस सेवा अनेक दिवसापासून बंद आहे त्यामुळे शाळेकडे विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी कसरत करावी लागत आहे.

नेहमीच हजारो वाहने या रस्तावरून जात येत असल्याने खड्डे आणि चिकन मुळे अपघात होण्याची शक्यता आहे. शिवाय रस्ता अनेक ठिकाणी अरुंद असल्यामुळे दोन वाहने खड्ड्यामुळे व्यवस्थीत पास होऊ शकत नाहीत. एक खड्डा चुकवित असताना दुसऱ्या खड्ड्यात वाहन जावून होणारा नाहक त्रास सहन करीत जीवघेणा प्रवास करावा लागत असल्याने नागरिक, वाहन चालक अन प्रवाशातून नाराजी दिसून येत आहे. संबंधित विभाग, लोकप्रतिनिधींनी तातडीने लक्ष घालून रस्ता दुरूस्त करण्याची मागणी पिंपळगाव नखाले ग्रामपंचायत सदस्य अक्षय गवळी यांनी केली आहे.





# सत्यशोधक डॉ.अण्णाभाऊ साठे सभागृहाचे काम प्रगती पथावर

केज । प्रतिनिधी

क्रांती नगर, कानडी रोड केज येथे नगर पंचायत केजच्या वतीने विशेष फंडातून नगराध्यक्ष सिताताई बनसोड, जनविकास परिवर्तनचे आघाडीचे प्रमुख हारूण ईनामदार, तसेच नगरसेवक अझहर भाई ईनामदार यांच्या विशेष प्रयत्नातून जवळपास १० लाख रुपये मंजूर करून, दोन महिन्यापासून ३० बाय २० चे सत्यशोधक डॉ.अण्णाभाऊ साठे सामाजिक सभाग्रहाचे काम सुरु आहे.

या ठिकाणी सभागृह व्हावे, याकरीता सामाजिक कार्यकर्ते बाबुराव गालफाडे यांच्या मार्गदर्शनाखाली अनेकदा अर्ज, निवेदने देऊन आंदोलने केलेली आहेत. आमच्या प्रतिनिधीशी बोलताना बाबुराव गालफाडे सर म्हणाले की, येत्या २६ नोव्हेंबर २०२५ सविंधान दिनापर्यंत या सभाग्रहात सुसज्य असे सत्यशोधक डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने वाचनालय सर्वांच्या सहकार्याने सुरु करणार आहोत. तसेच सभाग्रह मंजूर करून बांधकाम सुरु केल्या बद्दल नगर नगराध्यक्ष, गट प्रमुख, नगरसेवक, तसेच पालिका पदाधिकारी यांच्या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

# असोला येथे विज पडून दोन जनावरे मयत

धारूर । प्रतिनिधी

तालुक्यातील असोला येथे २१ जुलै रोजी रात्री बाराचे दरम्यान नांदूरकीचे झाडावर वीज पडल्याने शहाजी सखाराम चोले या शेतकऱ्याची एक म्हैस व एक गाय अशी दोन जनावरे दगावली. या ठिकाणचा पंचनामाही प्रशासनामार्फत करण्यात आला असून या शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे.

तालुक्यातील असोला येथे गावापासून ५० मीटर अंतरावर असणाऱ्या खोट्या जवळील नांदूरकीच्या झाडावर २१ जुलै रोजी रात्री बाराचे दरम्यान अचानक जोराचा पाऊस सुरू झाल्याने वीज पडून एक गाय व एक म्हैस शेतकरी शहाजी सखाराम चोले यांची जागीच मरण पावली. या ठिकाणचा पंचनामा



तलाठी एस.बी. बनकर यांनी केला असून या दोन्हीही जनावराचे शविच्छेदन धारूर येथील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत करण्यात आले आहे. प्रशासनाने या शेतकऱ्यास मदत देण्याची मागणी होत आहे.

# अपंग व्यक्ती संदिप सिरसट यांचे कुटुंबासह आमरण उपोषण

बीड । प्रतिनिधी

अपंग व्यक्ती संदिप सिरसट यांनी नगर परिषद बीड कार्यालय समोर सर्व कुटुंबासहित आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या समस्या गंभीर असल्याने, त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी हे उपोषण सुरू करण्याचा विचार केला आहे. संदिप यांचे घर पालवन चौक येथे आहे, आणि तिथे राहात असलेल्या शेजारील घरमालकांचे घानपाणी येत आहे. पश्चिमेकडील नाल्याचा पाण्याचा मार्ग अडविल्याने सर्व घानपाणी संदिप यांच्या घरासमोर साचत आहे. या परिस्थितीमुळे कुंटूबांतील लहान मुले आजारी पडण्याची भीती निर्माण झाली आहे.



संदिप सिरसट यांनी ११ जुलै २०२५ रोजी नगर परिषद बीडच्या मुख्याधिकारी यांना निवेदन सादर करून घानपाण्याची विल्हेवाट करण्याची मागणी केली. परंतु, त्यांच्या निवेदनाला कोणतीही दखल घेतली गेली नाही. यामुळे निराश झालेल्या संदिप यांनी २४ जुलै २०२५ रोजी नगर परिषद बीडच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे. या उपोषणाद्वारे त्यांनी नगर परिषदेच्या प्रशासनाला त्यांच्या समस्यांकडे लक्ष देण्यास भाग पाडण्याचा हेतू ठेवला आहे. संदिप यांचे हे उपोषण समाजात जागरूकता निर्माण करण्यास आणि अपंग व्यक्तींना मिळणाऱ्या अधिकारांची आवाज उठवण्यास सहाय्य करेल, असा विश्वास आहे.

## स्वस्त धान्याचा काळाबाजार थांबवा; होळच्या राशन दुकानदाराविरोधात गुन्हा नोंदवून परवाना रद्द करावा

# ग्रामस्थांचे पुरवठा अधिकाऱ्यांना निवेदन; कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील होळ येथील राशन दुकानातून काळ्या बाजारात विक्रीसाठी नेत असलेले ४४ क्विंटल शासकीय धान्य धारूरमध्ये दि.१४ जुलै रोजी पोलिसांनी पकडले. याप्रकरणी संबंधित राशन दुकानदारावर गुन्हा दाखल करून परवाना कायमस्वरूपी रद्द करावा, तसेच स्वस्त धान्याचा काळाबाजार थांबवावा, अशी मागणी होळच्या ग्रामस्थांनी निवासी उपजिल्हाधिकारी तथा प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडे सामाजिक कार्यकर्ते विजय केंद्रे, क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे, युवा नेते धनराज लाटे, बिभीषण शिंदे, राम घुगे, व्यंकटी घुगे यांनी मंगळवारी (दि.२२) केली आहे.

निवेदनात पुढे म्हटले की, १४ जुलै रोजी धारूर पोलिसांनी टेम्पो (क्र.एमएच ४४ यू २२५७) मधून ४४ क्विंटल शासकीय गहू आणि तांदूळ पकडले. वाहन चालक इब्राहिम शेखने पोलिस तपासात हे धान्य होळ येथील राशन दुकानदार अशोक तुकाराम घुगे यांच्याकडून विक्रीसाठी आणल्याची कबुली दिली. त्यांचा भाऊ आणि होळचे उपसरपंच बाळासाहेब घुगे यांच्या नावे दुकानाचा परवाना आहे. यानंतर पुरवठा विभागाने तपासणी केली. यामध्ये दुकानात गहू शिल्लक नसणे अपेक्षित असताना १ क्विंटल ९ किलो ५९० ग्रॅम गहू आढळून आला. तांदूळ हा ५९ किलो शिल्लक असणे अपेक्षित असताना तांदूळ नसल्याचे स्पष्ट झाले. यापूर्वी असाच गैरप्रकार उघडकीस आलेला असून ही दुसरी वेळ आहे. त्यामुळे होळचे उपसरपंच व राशन दुकानदार बाळासाहेब तुकाराम घुगे, काळ्या बाजारात पुरवठा करणारा अशोक तुकाराम घुगे यांच्यावर तत्काळ गुन्हा दाखल करावा. संबंधित दुकानाचा परवाना तात्काळ रद्द करावा, अशी मागणी केली आहे. कारवाई न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशाराही ग्रामस्थांनी निवेदनात दिला आहे.




### राजकीय दबावामुळे गुन्हा नोंद होईना; पुरवठा विभागाकडे दाखविले बोट!

काळ्या बाजारात जात असलेले राशन पोलिसांनी धारूरमध्ये पकडले. या प्रकरणानंतर पोलिसांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल होणे अपेक्षित होते. परंतु, पोलिसांनी पुरवठा विभागाकडे बोट दाखविले. हा टोलवाटोलवीचा सर्व प्रकार राजकीय दबावातून झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. दरम्यान, धान्याची तफावत आढळल्याने जिल्हा पुरवठा विभागाकडून केजच्या तहसीलदारामार्फत स्वस्त धान्य दुकानदाराला नोटीस बजावली जाणार आहे. तर, जप्त केलेल्या धान्याचे नमुने तपासणीसाठी धारूरच्या पुरवठा विभागाकडून प्रयोगशाळेकडे पाठविले जात आहेत.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT